**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी**

मी याद्वारे शपथपूर्वक कथन करतो की,

माझे नाव – बाळासाहेब कारभारी नवले

माझे वय ५४ वर्षे व्यवसाय शेती

राहणार लहीत बु., ता.अकोले, जि.अहमदनगर.

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती के. आर. उतळे यांचेमार्फत–**

**१.** दिनांक २०.०५.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजताचे सुमारास पोलीस श्री.तळपे यांनी मला फिर्यादी ज्योती गोरक्षनाथ चौधरी यांच्या घराजवळ पंचनाम्यासाठी बोलावले होते. त्यावेळी माझेसोबत आमचे गावचे सरपंच भाऊसाहेब हरिश्चंद्र चौधरी हे पंच म्हणून हजर होते. ते घटनास्थळ फिर्यादी ज्योती गोरक्षनाथ चौधरी व तिचे पती गोरक्षनाथ दादा चौधरी यांनी दाखविले. घटनास्थळाच्या पूर्वेला एकनाथ दशरथ बोराडे यांचे घर, पश्चिमेला फिर्यादीचे घर, दक्षिणेला प्रकाश भागा चौधरी यांचे घर व उत्तरेला फिर्यादी यांची विहीर व जमीन आहे. पोलिसांनी त्या ठिकाणाहून वेळुच्या दोन काठ्या जप्त केल्या. त्यानुसार पोलिसांनी माझेसमोर घटनास्थळाचा व मुद्देमाल काठ्या जप्तीचा पंचनामा तयार केला. पोलिसांनी मला तो पंचनामा वाचून दाखविला नाही. आता मला तो पंचनामा दाखविला. त्या पंचनाम्यावर माझी व भाऊसाहेब हरिश्चंद्र चौधरी यांची सही आहे. माझी सही मी ओळखतो. भाऊसाहेब हरिश्चंद्र चौधरी यांची सही देखील मी ओळखतो. त्या पंचनाम्यातील मजकूर खरा व बरोबर नाही. त्या पंचनाम्यावरील साक्षीदार क्र.१ यांच्या सहीला **निशाणी पी–२९** देण्यात आली. आता मला मुद्देमाल काठ्या दाखविल्या. त्या काठ्या गुन्हयात वापरलेल्या काठ्या नाहीत.

**(साक्षीदार अभियोग पक्षास काही अंशी सहाय्य करीत नसल्याने सहा. सरकारी वकील यांनी केलेल्या विनंतीनुसार त्यांना साक्षीदारास उलटतपासामध्ये विचारतात त्या स्वरुपाचे प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.)**

**२.** हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी माझेसमोर तो पंचनामा लिहिला. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने दिनांक १९.०५.२०२४ रोजीचे घटनेबाबत पोलिसांना आमचेसमोर सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे फिर्यादीच्या घरासमोर होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी फिर्यादी यांना ज्या काठ्यांनी मारहाण केली होती, त्या काठ्या दाखविल्या. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी त्या काठ्या माझेसमोर जप्त केल्या. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी तो पंचनामा आम्हाला वाचून दाखविला व त्यावर माझी सही घेतली. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपींना चांगले ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना शिक्षा होवू नये म्हणून याकामी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>आरोपींतर्फे विधीज्ञ श्री.के.बी.हांडे यांचेतर्फे उलटतपास–</u>**

**३.** हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी तयार पंचनाम्यावर माझी सही घेतली व त्या व्यतिरिक्त मला त्या पंचनाम्याबाबत काहीही माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी त्या गावातील असल्याने माझ्या वैयक्तिक माहितीनुसार मी घटनास्थळाच्या चतु:सिमा सांगितल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मला त्या घरांचे ग्रामपंचायत नंबर व जमिनींचे सर्व्हे नंबर सांगता येणार नाहीत. पोलीस ज्या मोटारसायकलीने आले होते, त्याचा नंबर मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीचे पती गोरक्षनाथ चौधरी हे माझे मित्र आहेत. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी माझेसमोर पंचनामा केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी माझी फक्त सही घेतली. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी माझेसमोर काठ्या जप्त

केल्या नाहीत व त्या काठ्या मी ओळखत देखील नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी याकामी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
सदरचा जबाब माझे समक्ष नोंदविणेत आला.

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2025.09.09 17:18:23 +0530

**(डी.एम.हिंग्लजकर)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले,**
**ता.अकोले, जि.अहमदनगर**

**दिनांक – ०९.०९.२०२५**